Sahitya Akademi Yuva & Bal Sahitya Puraskar-2019

'Maharashtra Times' 15 June 2019

महाराष्ट्र टाइम्स | शनिवार, १५ जून २०१९

## शिंदे, मुल्ला यांना 'साहित्य अकादमी'



सुशीलकुमार शिंदे



सलीम मुल्ला

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली**

'शहर आत्महत्या करायचंय म्हणतंय' या काव्यसंग्रहासाठी यंदाचा साहित्य अकादमी युवा पुरस्कार सुशीलकुमार शिंदे यांना, तर 'जंगल खजिन्याचा शोध' या कादंबरीसाठी साहित्य अकादमीचा बाल साहित्य पुरस्कार सलीम सरदार मुल्ला यांना जाहीर झाला आहे. कोकणी भाषेतील युवा साहित्य पुरस्कार हेमंत आइया आणि बाल साहित्य पुरस्कार राजश्री बांदोडकर कारपूरकर यांनी पटकावले.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष प्रा. चंद्रशेखर कंबार यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी आगरतळा येथे झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत साहित्य अकादमीच्या बाल साहित्य आणि युवा साहित्य पुरस्कारांसाठी लेखकांची निवड करण्यात आली. ➤ वृत्त...८

# शिंदे, मुल्ला यांचा सन्मान

## साहित्य अकादमीचे युवा, बाल साहित्य पुरस्कार जाहीर

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली**

'शहर आत्महत्या करायचंय म्हणतंय' या कवितेसाठी यंदाचा साहित्य अकादमी युवा पुरस्कार सुशीलकुमार शिंदे यांना, तर 'जंगल खजिन्याचा शोध' या कादंबरीसाठी साहित्य अकादमीचा बाल साहित्य पुरस्कार सलीम सरदार मुल्ला यांना जाहीर करण्यात आला आहे. कोकणी भाषेतील युवा साहित्य पुरस्कार हेमंत आइया आणि बाल साहित्य पुरस्कार राजश्री बांदोडकर कारपूरकर यांनी पटकावले आहेत.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष प्रा. चंद्रशेखर कंबार यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी आगरतळा येथे झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत साहित्य अकादमीच्या बाल साहित्य आणि युवा साहित्य पुरस्कारांसाठी लेखकांची निवड करण्यात आली. ताम्रपट आणि ५० हजार रुपये रोख असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे. साहित्य अकादमी २०१९च्या युवा पुरस्कारांची २३ भाषांसाठी घोषणा करण्यात आली. सहा पुस्तके, ५ कादंबऱ्यांसह ११ पुस्तके, एक साहित्य समीक्षा आणि १० कवितांची पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली.




मराठी साहित्य प्रकारात 'शहर आत्महत्या करायचंय म्हणतंय' या कवितेसाठी सुशीलकुमार शिंदे यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. शिंदे यांची निवड गणेश आवटे, प्रफुल्ल शिलेदार आणि श्रीकांत देशमुख यांच्या निवड मंडळाने केली. कोकणी साहित्य प्रकारात 'कथाकार' या कथेसाठी हेमंत आइया यांची निवड करण्यात आली. आइया यांची निवड डॉ. चंद्रशेखर चिनॉय, गोकुलदास प्रभू आणि तुकाराम सेठ यांच्या निवड मंडळाने केली.

साहित्य अकादमीच्या २०१९च्या बाल साहित्य पुरस्कारांसाठी २२ लेखकांची निवड करण्यात आली असून त्यात मराठीतील 'जंगल खजिन्याचा शोध' या कादंबरीसाठी सलीम सरदार मुल्ला यांची निवड करण्यात आली आहे. मुल्ला यांची निवड रणधीर शिंदे, अतुल पेठे आणि वीणा गवाणकर यांच्या निवड मंडळाने केली. कोकणी भाषेतील 'चिटुकल्या चिंकीचे विशाल विश्व' या कथेसाठी राजश्री बांदोडकर कारपूरकर यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. कोकणी भाषेसाठी दामोजी मौजो, प्रकाश कामत आणि विंची कुआद्रोस यांच्या निवड मंडळाने काम पाहिले. बाल साहित्य पुरस्कार १४ नोव्हेंबर २०१९ रोजी आयोजित केल्या जाणाऱ्या विशेष समारंभात प्रदान करण्यात येतील. मैथिली भाषेतील युवा आणि बाल साहित्य पुरस्कारांची घोषणा लवकरच करण्यात येणार असल्याचे साहित्य अकादमीने म्हटले आहे.




**"**

**शहराच्या परिवेशात जगताना आजूबाजूचा कोलाहल मला अस्वस्थ करत होता. तेच जीवन मी शब्दांत उतरवत गेलो. ज्यांच्यासाठी कविता लिहितो त्यांच्यापर्यंत त्या पोहोचत नाहीत. ज्याच्या विरोधात असते, त्याला फरक पडत नाही. दाभोलकरांची हत्या होते; पण मी काय करू शकतो? थोडक्यात गोंधळाच्या अवस्थेत राहण्याची सक्ती आहे. साहित्य संमेलनात कधीही कविता सादर केली नाही. माझ्या कविता आनंदाच्या नाहीत. त्या वाचू वाटत नाहीत. वाचल्या तर त्रास होतो.**

**– सुशीलकुमार शिंदे, कवी**

**पुरस्कारामुळे आनंद तर झालाच. त्याहीपेक्षा ज्या 'जंगल संस्कार' जाणिवेतून लहान मुलांसाठीचे लेखन करीत आलो, त्याला यानिमित्ताने मोठे प्रोत्साहन मिळाले. जंगल फिरस्तीत आलेल्या अनुभूतींची मांडणी चित्ताकर्षक ठरली. आता परिचित दुर्मिळ झाडांना ललित शैलीतून बोलते करायचे आहे. कारण अशी वृक्षसंपदा वैज्ञानिक दृष्टिकोनातून माहीत असते. त्यांचेही काही गहिरे, अनवट रागरंग असतात. सतत सान्निध्यात असाल तर ते कळतात. या झाडांच्या आजपर्यंत झाकोळलेल्या अंतरंगांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहे.**

**– सलीम मुल्ला, लेखक**

Sahitya Akademi Yuva & Bal Sahitya Puraskar — 2019

'Loksatta' 15 June 2019

लोकसत्ता मुंबई, शनिवार, १५ जून २०१९

## शिंदे, मुल्ला यांना साहित्य अकादमी

नवी दिल्ली : साहित्य अकादमीच्या युवा आणि बाल साहित्य पुरस्कारांची घोषणा शुक्रवारी करण्यात आली. मराठी भाषेसाठी कवी सुशीलकुमार शिंदे यांच्या 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय...' या कवितासंग्रहाला यंदाचा युवा साहित्य पुरस्कार, तर सलीम मुल्ला यांच्या 'जंगल खजिन्याचा शोध' या कादंबरीसाठी बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. - पान ६

# कवी सुशीलकुमार शिंदे यांना युवा, सलीम मुल्ला यांना बाल साहित्य अकादमी पुरस्कार

विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली



सुशीलकुमार शिंदे



सलीम मुल्ला

**साहित्य अकादमीच्या** युवा आणि बाल साहित्य पुरस्कारांची घोषणा शुक्रवारी करण्यात आली. मराठी भाषेसाठी कवी सुशीलकुमार शिंदे यांच्या 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय...' या कवितासंग्रहाला यंदाचा युवा साहित्य पुरस्कार, तर सलीम मुल्ला यांच्या 'जंगल खजिन्याचा शोध' या कादंबरीसाठी बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

३५ वर्षांच्या आतील साहित्यिकांसाठी दिल्या जाणाऱ्या युवा पुरस्कारांसाठी साहित्य अकादमीने यंदा २३ भाषांमधील (मैथिली वगळता) युवा साहित्यिकांच्या ११ काव्यसंग्रह, सहा कथासंग्रह, पाच कादंबऱ्या आणि एका समीक्षापर पुस्तकाची निवड केली आहे. यंदा युवा पुरस्कारांत कविता हा साहित्यप्रकार प्रभावी ठरल्याचे दिसत असून मराठी भाषेसाठीही युवा कवी सुशीलकुमार शिंदे हे 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय...' या त्यांच्या कवितासंग्रहासाठी पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. महानगरीय वास्तव्यातील कोलाहल, घुसमट आणि स्थलांतरितांचे भावविश्व अभिव्यक्त करणारा हा संग्रह 'ग्रंथाली' प्रकाशनाने प्रसिद्ध केला आहे. मूळचे भाट-निमगाव (ता. इंदापूर) येथील कवी शिंदे यांचे महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात झाले. कृषी व व्यवस्थापनशास्त्रात पदवीधर असलेले कवी शिंदे नोकरीच्या निमित्ताने पाच वर्षे मुंबई महानगरीत वास्तव्यास होते. मात्र- 'शहरात राहिलो तरी गाव काही सुटले नाही आणि शहराचा झालो नाही, अशी काहीशी माझी अवस्था झाली. आजूबाजूच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्थित्यंतराने माणूस म्हणून व्यथित होत असतो. हीच व्यथा शब्दबद्ध करताना कवितेचा जन्म होतो,' असे सांगणाऱ्या कवी शिंदे यांच्या कवितेत गिरणी कामगारांची व्यथा, १९९२-९३ च्या दंगलीनंतरचे वातावरण, झोपडपट्टी आणि कामाठीपुरा या भागातील वास्तवाचे प्रतिबिंब उमटले आहे. चमचमत्या दुनियेतील टोलेजंग इमारती एका बाजूला आणि आडोशाला वाढत जाणारी झोपडपट्टी या वास्तव दर्शनाने आलेली अस्वस्थताच शब्दबद्ध केल्याचे, ते सांगतात. 'मी जे काही लिहिले, त्याला कविता म्हणतात की नाही, हेदेखील माहीत नसताना ग्रामीण भागातील संवेदनांचा साहित्य अकादमी पुरस्काराने गौरव झाला याचा मनापासून आनंद झाला. हा पुरस्कार म्हणजे माझ्यासारख्या काहीतरी लिहू पाहणाऱ्याला पाठीवर मिळालेली कौतुकाची थाप आहे,' अशी भावना शिंदे यांनी व्यक्त केली.

गेल्या नऊ वर्षांत सहा वेळा मराठी भाषेसाठी बाल साहित्याचे पुरस्कार साहित्यिकाच्या एकंदरीत कारकीर्दीसाठी दिले गेले. तो शिरस्ता मोडून यंदा बालसाहित्य पुरस्कार सलीम मुल्ला यांच्या 'जंगल खजिन्याचा शोध' या कादंबरीस जाहीर झाला आहे. मूळचे कोल्हापूरच्या तळदंगेचे (ता. हातकणंगले) असलेले मुल्ला वनविभागात वनरक्षक म्हणून कार्यरत आहेत. हे काम करतानाच निसर्गाशी आलेल्या जवळीकतेतून 'जंगल खजिन्याचा शोध' ही कादंबरी त्यांनी साकारली. जंगलातील मौल्यवान औषधी वनस्पतींची तस्करी करणाऱ्या टोळ्यांचे निर्दालन करणाऱ्या वानरसेनेची कहाणी त्यांनी या कादंबरीत रेखाटली आहे.

'पशु पक्षी, वन्यजीवन याचा तपशील नव्या पिढीसमोर आणून त्यांना पर्यावरणाविषयी डोळस बनवण्याच्या माझ्या प्रयत्नांना मिळालेली ही मोठी दाद आहे,' अशी प्रतिक्रिया त्यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना व्यक्त केली.

### मी गोंधळलेला असण्याची सक्ती

ज्यांच्यासाठी कविता लिहितो, त्यांच्यापर्यंत ती पोहोचतच नाही आणि ज्यांच्याविरोधात कविता लिहिली त्यांना काहीच फरक पडत नाही, अशी माझी अवस्था आहे. मी गोंधळलेला असण्याचीच माझ्यावर सक्ती आहे, अशी व्यथा कवी सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केली. ऐश्वर्य पाटेकर, नवनाथ गोरे, अवधूत डोंगरे आणि धम्मकीर्ती सुमंत अशा यापूर्वी हा पुरस्कार मिळालेल्या मित्रांनी नावीन्यपूर्ण लेखन केले आहे. नवे लेखक पुस्तकी पटापेक्षा वेगळे मांडू पाहत आहेत, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

Sahitya Akademi Yuva & Bal Sahitya Puraskar-2019

'Sakal' 15 June 2019

सकाळ मुंबई, शनिवार, १५ जून २०१९

# सुशीलकुमार शिंदेंना युवा साहित्य अकादमी



शिंदे

नवी दिल्ली, ता. १४ : साहित्य अकादमीतर्फे आज यंदाच्या विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. एकूण २३ भाषांसाठी युवा पुरस्कार जाहीर झाले असून, मराठीत सुशीलकुमार शिंदे यांच्या 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय' या काव्यसंग्रहाला हा पुरस्कार जाहीर झाला. मराठी भाषेतीलच सलीम सरदार मुल्ला यांच्या 'जंगल खजिन्याचा शोध' या कादंबरीस बालसाहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे; तर कोकणी भाषेतील 'चिटकुल्या चिंकीचे विशाल विश्व' या राजश्री बांदोडकर करपूरकरलिखित कथासंग्रहाची पुरस्कारासाठी निवड झाली. कोकणी भाषेतील आणखी एका लघुकथासंग्रह असलेल्या 'कथाकार' या साहित्यकृतीलाही पुरस्कार जाहीर झाला. पन्नास हजार रुपये रोख आणि ताम्रपट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मराठी भाषेच्या निवड मंडळात रणधीर शिंदे, अतुल पेठे आणि वीणा गवाणकर यांचा समावेश होता. कोकणी निवड समितीत दामोदर माउझो, प्रकाश कामत आणि व्हिनसी क्वाद्रोस यांचा समावेश होता.

## मानाचा पुरस्कार मिळाल्याचा आनंद : शिंदे

माझ्या 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय' या काव्यसंग्रहाला यंदाचा युवा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर मला निश्चित आनंद आहे. हा अत्यंत महत्वाचा आणि मानाचा असा पुरस्कार असल्याची प्रतिक्रिया कवी सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केली. गावातून शहरात आलेली माणसे येथे कशी राहतात, जगण्यासाठी कशी झगडतात, खाण्यापिण्या पासून ते त्यांचे अस्तित्व असण्यापर्यंत म्हणजे त्यांचे चेहरे पुसण्यापर्यंतचा काळ माझ्या कवितेत उतरवला आहे. २०१६ ते २०१९ व कवितासंग्रह प्रकाशित होण्याआधीच्या काळात दाभोळकरांची हत्या होते, आपण काय करू शकलो, तपास चालू असतो, यंत्रणा हालचाल करते पण आपण हे जग वैयक्तिक काहीही करू शकत नाही. अशा घुसमटीच्या काळात आपण रचनात्मक पद्धतीने लिहितो म्हणून ती कविता असते, अशी प्रतिक्रिया शिंदे यांनी व्यक्त केली आहे.